**प्रेस नोट** **दि.१२/०७/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे

## विधीसंघर्षीत बालकाचे ताब्यातून गुन्हयातील चोरीस गेलेली मोटार सायकल जप्त केले बाबत.

दि.१२/०७/२०१९ रोजी पोलीस उप-निरीक्षक श्री. घुगे , तपास पथक इन्चार्ज सोबत स्टाफ पोहवा ५४३२ सावंत, पोना ३८६४ भालचिम, पोना किरवे , पोशि ९०८९ मोरे, पोशि ७२९६ पठाण असे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्रमांक २४५/२०१९ भादवि कलम ३७९ या दाखल गुन्ह्यातील चोरीस गेले मोटार सायकलचा गुप्तपणे शोध घेत असताना, महालक्ष्मी सोसायटीच्या मागील बाजुस, एसआरए स्कीमच्या गेट जवळ चव्हाण चाळ पुणे येथे एक मुलगा सी.डी.डिलक्स कंपनीची मोटार सायकल घेवुन जात असताना दिसल्याने त्यांनी मोटार सायकल थांबवून खात्री केली असता ती दाखल गुन्हयातील मोटार सायकल एम एच १२ डीजे ७२२ ही असलेची खात्री झालेने त्यास स्टाफचे मदतीने मोटार सायकलसह ताब्यात घेऊन त्यांचे नाव पत्ता विचारला त्याने स्वतःचे नाव विशाल संपत चंदणशिवे वय १७ वर्षे रा. कामगारनगर, येरवडा, पुणे असे असल्याचे सांगीतले. त्याचेजवळील मिळुन आलेल्या मोटार सायकल बाबत विचारणा केली असता त्याने सदरची गाडी ही राजीव गांधीनगर येथून रोड वरून चोरली असल्याचे सांगितले पंचासमक्ष किंमत रुपये १०,०००/- ची सी डीडिलक्स कंपनीची मोटार सायकल क्र. एम एच १२ डीजे ७२२ ,काळ्या रंगाची जप्त करणेत आली आहे.

सदरची कारवाई मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक राहूल घुगे, पोहवा विजय सावंत, पोना प्रविण भालचिम, पो ना यशवंत किरवे, पोशि प्रफुल्ल मोरे, पोशि रिहान पठाण, यांनी पार पाडली आहे.